अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 09 एप्रिल 2026 | वर्ष 11 वे | अंक 34 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# ७२ लाखांच्या वसुलीचे कंत्राट मात्र ६ लाखांत!

## ब्रम्हपुरी न.प.चा अजब कारभार; कंत्राटदाराच्या फायद्यासाठी पालिकेचा महसूल पणाला?

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद प्रशासनाने आठवडी बाजार, गुजरी आणि पथविक्रेत्यांकडून दैनंदिन कर वसुलीचे कंत्राट ज्या दरात दिले आहे, त्यावरून सध्या शहरात संशयाचे काहूर माजले आहे. वर्षभरात लाखो रुपयांची उलाढाल अपेक्षित असताना, केवळ ६ लाख रुपयांत हे कंत्राट बहाल करण्यात आल्याने 'हा कंत्राटदाराच्या लाभासाठीचा खेळ आहे की प्रशासनाची मोठी चूक?' असा सवाल किरकोळ विक्रेते आणि




नागरिक उपस्थित करत आहेत.

नगर परिषदेने ३० मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ च्या कलम २७३ नुसार दैनंदिन कर वसुलीसाठी निविदा प्रक्रिया राबवली. यामध्ये सर्वाधिक बोली लावणारे देसाईगंज येथील मोहम्मद शरीफ अब्दुल करीम शेख यांना १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीसाठी कंत्राट मंजूर करण्यात आले. हे कंत्राट अवघ्या ६ लाख रुपयांत देण्यात आले आहे.

कंत्राटदाराला आठवडी बाजार (कृषी समिती क्षेत्र वगळून), दैनंदिन गुजरी, सार्वजनिक जागा, पथविक्रेते, हातगाडी आणि वाहनांवर व्यवसाय करणाऱ्यांकडून शुल्क वसूल करण्याचे अधिकार दिले आहेत. शहराचा विस्तार पाहता अशा विक्रेत्यांची संख्या ५०० ते ७०० च्या घरात आहे. दैनिक वसुली

### समोपचाराने प्रश्न मिटवू - नगराध्यक्ष मिसार

**बसका शुल्क वसूल संबंधात नागरिकांमध्ये असंतोष असल्याची जाणीव आहे. गुजरी, आठवडी बाजार या व्यतिरिक्त इतर व्यवसायिकांकडून सुद्धा वसुली केली जात आहे. यासंबधात समस्या निवारणार्थ व्यावसायिकांची नगर पालिका पदाधिकारी व मुख्याधिकारी यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये योग्य निर्णय घेण्यात येईल.**

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# मेंडकीत 30 लाखांच्या शासकीय इमारतीवर काँग्रेस नेत्याचा कब्जा!

## फसवणूक करून पीक विम्याचे पैसे उचलल्याचा खळबळजनक आरोप!

ब्रम्हपुरी/का.प्र.

गाव विकासाच्या नावाखाली शासकीय निधीचा वापर करून बांधलेल्या सामाजिक सभागृहावर चक्क एका राजकीय नेत्याने ताबा मिळवल्याचा धक्कादायक प्रकार मौजा मेंडकी येथे उघडकीस आला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव व माजी पंचायत समिती सदस्य थानेश्वर कायरकर यांनी ग्रामपंचायतीच्या स्थावर मालमत्तेवर अनधिकृत ताबा मिळवल्याचा आरोप होत असून, या प्रकरणाने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मेंडकी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेसमोर गायडोंगरी रिठ गट क्र. १७ व १८ (क्षेत्र ०.२३ हेक्टर) ही जमीन वर्ग-२ ची असून ती थानेश्वर कायरकर व राजेश्वर कायरकर यांच्या नावे आहे. विशेष म्हणजे, या जमिनीच्या ७/१२ वर 'हस्तांतरणास बंदी' असा स्पष्ट उल्लेख आहे. असे असतानाही, संबंधित व्यक्तींनी सार्वजनिक बांधकाम विभागाला कोऱ्या कागदावर संमती पत्र देऊन २५१५ अंतर्गत ३० लक्ष रुपये खर्चाचे सामाजिक सभागृह मंजूर करून घेतले. महसूल विभागाने सदर जमीन अद्याप ग्रामपंचायतीला हस्तांतरित केलेली नाही. नियमानुसार, जमिनीचे हस्तांतरण झाल्याशिवाय ग्रामपंचायतीच्या 'नमुना ८' वर तिची नोंद होऊ शकत नाही. तरीही, कोणत्या दबावाखाली या सभागृहाच्या अंदाजपत्रकाला मंजुरी मिळाली आणि बांधकाम पूर्ण झाले, हा मोठा प्रश्नचिन्ह आहे.

सभागृहाचे बांधकाम पूर्ण होऊन दोन वर्षे उलटली आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप याचा ताबा ग्रामपंचायतीला दिलेला नाही. आश्चर्याची बाब म्हणजे, या शासकीय इमारतीच्या गेटची चाबी थानेश्वर कायरकर यांच्याकडे असून, त्यांनी या मालमत्तेवर खासगी कब्जा केल्याचे दिसून येत आहे.ज्या जमिनीवर ३० लाखांची इमारत उभी आहे, त्याच जमिनीवर कायरकर यांनी २०२४, २०२५ आणि २०२६ या वर्षांत मोबाइलवरून 'ई-पिक पाहणी' नोंदवली. इतकेच नव्हे तर फेडरेशन ऑनलाइन करून या जागेवर पीक विम्याची रक्कमही उचलल्याची माहिती समोर आली आहे. या गंभीर भ्रष्टाचार आणि फसवणुकीच्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते विनायक पाकमोडे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांनी पत्रकार परिषदेतून गायडोंगरी रिठ गट क्र. १७ व १८ ही जमीन तात्काळ बेदखल करण्यात यावी. महसूल विभागाने तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून ही जमीन ग्रामपंचायतीला हस्तांतरित करावी. शासकीय निधीचा गैरवापर आणि प्रशासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी थानेश्वर कायरकर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा. अशा मागण्यांचे निवेदन प्रशासनाला दिले आहे.

**थानेश्वर कायरकर यांनी त्यांच्यावरील आरोप पूर्णपणे फेटाळले आहेत. ''माझ्या मालकीच्या जागेवर बांधकाम झाले असेल तर त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व मेंडकी ग्रामपंचायत यांनी स्पष्टीकरण दिले पाहिजे. यांत माझा दोष नाही तसेच पीक विम्याची उचल केल्याचा आरोप निराधार आहे. सेवा सहकारी संस्थेची निवडणूक समोर असल्याने माझी राजकीय प्रतिमा डागाळण्यासाठी विरोधकांचे हे कारस्थान आहे.''**

**- थानेश्वर कायरकर**

जर प्रशासनाने यावर त्वरित कारवाई केली नाही, तर १ मे (महाराष्ट्र दिन) पासून आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा विनायक पाकमोडे यांनी दिला आहे. आता महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन या 'हायप्रोफाईल' प्रकरणावर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.



संपादकीय...

## सीडीआर फुटीचा फटका

कुठल्याही वादग्रस्त प्रकरणाशी राजकारणाचा कसा संबंध असेल हे सांगता येत नाही. तसेच कुठल्याही प्रकरणाचा राजकारणाशी कसा संबंध जोडला जाईल याचीही शाश्वती नाही. कुठलेही वादग्रस्त प्रकरण उघडकीस आले की ते हळूहळू राजकारणाकडे सरकतेच. त्यातील खरे काय आणि खोटे काय हे सामान्य जनतेला कधीच कळत नाही. कारण दोन्ही बाजू तितक्याच हिरिरीने मांडल्या जातात. त्यामुळे काही दिवसांनी प्रत्येक वादग्रस्त प्रकरण विसरून जायचे इतकेच जनतेच्या हाती उरते. ढोंगीबाबा अशोक खरात याच्याशी अनेक राजकारण्यांचा संबंध असल्याचे काही लपून राहिलेले नाही. किंबहुना सगळ्याच पक्षांच्या नेत्यांचे त्याच्याशी उत्तम संबंध असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता प्रकरण अंगलट येणार असल्याची जाणीव होताच सारे राजकारणी नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करीत आहेत तो भाग वेगळा. मात्र दुसऱ्या पक्षांचे नेते कसे खरात याच्याशी संबंधित आहेत हे दाखवण्याचा प्रयत्न आता सगळीच नेतेमंडळी करत आहेत.

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अशोक खरात याच्याशी कुठल्या राजकारण्यांशी किती वेळा मोबाईल फोनवरून बोलणे झाले याचा तपशीलच जाहीर केल्याने खळबळ उडाली आहे. खरातचा कॉल डेटा रेकॉर्ड सादर करून त्यांनी नेत्यांचे आर्थिक आणि राजकीय संबंध असल्याचा दावा केल्याने राज्याच्या राजकारणात वादंग निर्माण झाला. अर्थात हा तपशील खरा आहे की खोटा आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. कारण पोलीस तपास अद्याप सुरू असताना यांची पुष्टी करणार कोण? मात्र अंजली दमानिया या हाती पुरावे आल्याशिवाय बोलत नाहीत, अशी त्यांची प्रतिमा आहे. त्यांनी अनेक भ्रष्टाचाराच्या प्रकरणांना वाचा फोडली आहे. त्यात नितीन गडकरी आणि एकनाथ खडसे यांच्याविरोधातील मोहिमा चर्चेत होत्या. त्यांनी अनेक हाय प्रोफाईल भ्रष्टाचार प्रकरणांमध्ये कायदेशीर लढा दिला आहे.

आतापर्यंत प्रत्येक प्रकरणात आवाज उठवताना त्या जबाबदारपणे आरोप करतात आणि सरकारला त्यांची दखल घ्यावी लागते, असे दिसते. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणही त्यांनी असेच लावून धरले होते. त्या थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रारी करतात. वाल्मिक कराड याच्यावरील कारवाई आणि धनंजय मुंडे यांना पद गमवावे लागण्यामागे स्पष्ट वक्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अंजली दमानिया यांचा विरोधही कारणीभूत ठरल्याचे मानले गेले. आता अंजली दमानिया या ज्या नेत्यांची प्रामुख्याने नावे घेत आहेत ती मंडळी महायुतीतील भाजपवगळता अन्य पक्षातील आहे. त्यामुळे अंजली दमानिया यांच्या खांद्यावर बंदूक ठेवत भाजपच या नेत्यांना लक्ष्य करीत आहे का, अशी शंका व्यक्त केली जात आहे. कारण ज्या धडाक्याने दमानिया कॉल्सचे तपशील जाहीर करत आहेत त्यावरून जबाबदार पदावरील व्यक्तीच ते त्यांना पुरवत असेल, असा कयास व्यक्त केला जात आहे. कारण कुठल्याही व्यक्तीच्या मोबाईल फोनच्या कॉल डिटेल्ससह अन्य तपशील अतिशय गोपनीय असतो आणि तपास यंत्रणा वगळता तो अन्य कुणालाही मिळवता येत नाही.

वास्तविक अशोक खरात याच्यासोबत सर्वच पक्षांचे नेते संबंध ठेवून असल्याने झाडून साऱ्या पक्षाच्या नेत्यांची नावे चर्चेत यायला हवी होती. मात्र तसे होताना दिसत नाही. नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याच्या श्री शिवनिका संस्थानसाठी दारणा धरणातून वर्षाला ३९ लाख लिटर पाणी मंजूर करण्यात आले होते. ३१ जुलै २०२० रोजी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारच्या काळात या पाणीपुरवठ्याचा शासन निर्णय काढण्यात आला होता. याचाच अर्थ चक्क शासनही खरातच्या घरी पाणी भरत होते. मराठवाड्याच्या हक्काचे पाणीही खरातच्या खासगी संस्थेसाठी वळवण्यात आले होते. हे सारे राजकीय वरदहस्त असल्याशिवाय शक्य नाही. आता सीडीआर फुटीची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार खरोखरच निष्पक्ष चौकशी होत सीडीआर फोडणारे कोण हे उघड झाले तर तो प्रकार सर्वच राजकारण्यांना उघडे करण्यासाठी झाला की केवळ ठराविक पक्षाच्या नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी झाला हे स्पष्ट होईल. मात्र तोपर्यंत कोणाचाही मुलाहिजा न राखता सरकारने खरात प्रकरणाची चौकशी करण्याचे कर्तव्य पार पाडले पाहिजे.

# विद्यापीठातील हे २८ मेरिट विद्यार्थी आमचे २८ अलंकार

## अशोक भैया : ने.हि. महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ



ब्रह्मपुरी/का.प्र.

''सत्र २०२४-२५ मधिल गोंडवाना विद्यापीठीय परीक्षेत आपल्या नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांनी मेरिट यादित येऊन महाविद्यालयाचा मान उंचावला. हे विद्यार्थी जीवनात खूप मोठे होतील. हे २८ विद्यार्थी आपल्या महाविद्यालयाचे २८ अलंकार आहेत'', असे मार्मिक भाष्य नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैयांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या पदवीदान समारंभात बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, प्रा विनोद नरड, डॉ राजू आदे उपस्थित होते. यावेळी मेरिट विद्यार्थ्यांना पदवीदान करुन त्यांचा गौरव करण्यात आला.यावर डॉ खानोरकर व प्राचार्य डॉ शेकोकरांनी भाष्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक डॉ आदे, संचालन डॉ प्रकाश वट्टी तर आभार प्रदर्शन प्रा निलिमा रंगारींनी मानले. कार्यक्रमाला समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# "नव्वद दिवस नव्वद विषय" घेऊन बोली संवर्धन

## ब्रम्हपुरी झाडीबोली शाखेतर्फे महाराष्ट्रभर अनोखा बोलीजागर उपक्रम

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील झाडीबोली साहित्य मंडळातर्फे संपूर्ण महाराष्ट्रात विविध बोलीचे संवर्धन व जतन व्हावे या उद्देशाने ब्रह्मपुरी झाडीबोली शाखेने महाराष्ट्रातील झाडीबोली, वऱ्हाडी, नागपूरी, खानदेशी, कोकणी, मालवणी अशा विविध बोलीमध्ये 'नव्वद दिवस: नव्वद विषय' घेऊन अनोखा उपक्रम सुरू केलेला असल्याचे शाखाप्रमुख कवी संतोष मेश्रामचे सांगणे आहे.




यासाठी ३३ वे झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, कवी, स्तंभलेखक व झाडीबोलीचे भाष्यकार डॉ धनराज खानोरकर, लेखक व कवी, झाडीबोली जिल्हाध्यक्ष अरुण झगडकर, कवी व गडचिरोली जिल्हाध्यक्ष प्रा विनायक धानोरकर, कवी मुरलीधर खोटेले हे यात सल्लागार असून कवी धनंजय पोटे, गडचिरोलीच्या किरण चौधरी, गायत्री गुरव, अमरावतीच्या वृषाली चोरे, योगिता निपाने, नाशिकचे अनिकेत सागर हे समूह प्रशासक म्हणून काम सांभाळत आहेत.

# ब्रम्हपुरीत साई उत्सव उत्साहात संपन्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील विद्यानगर परिसरातील साई मंदिरात दरवर्षीप्रमाणे आयोजित त्रिदिवसीय 'साई उत्सव' यंदाही भक्तीमय आणि उत्साही वातावरणात पार पडला. २५ ते २७ मार्च दरम्यान चाललेल्या या महोत्सवात धार्मिक कार्यक्रमांची मांदियाळी पाहायला मिळाली. यावेळी संपूर्ण ब्रह्मपुरी शहर साईंच्या जयघोषाने दुमदुमले होते.

उत्सवाची सुरवात २५ मार्च रोजी दुपारी भव्य साई पालखी मिरवणुकीने झाली. फुलांनी सजवलेली पालखी आणि भक्तांच्या 'ओम साई राम'च्या गजराने शहराचा मुख्य मार्ग भक्तिमय झाला. त्यानंतर २६ मार्च रोजी सकाळी १० वाजता प्रभू श्रीराम जन्मोत्सवाचा सोहळा पार पडला. पाळणा आणि फुलांची उधळण करत भाविकांनी श्रीरामाचा जन्मोत्सव साजरा केला. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी, २७ मार्च रोजी प्रसिद्ध कीर्तनकार हभप सविता खरवडे यांचे कीर्तन झाले. आपल्या सुश्राव्य वाणीतून त्यांनी साईबाबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. कीर्तनानंतर 'काल्याचा कार्यक्रम' पार पडला, ज्यामध्ये शेकडो भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. महाप्रसाद कार्यक्रम सायंकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत सुरू होता.

## विनोदिनी

आयुर्वेदाच्या क्लिनिकमध्ये एक माणूस पोटात तीव्र दुखण्याची तक्रार घेऊन आला. वैद्याला समजले की हा बद्धकोष्ठतेचा आजार आहे.

वैद्याने रूग्णाला त्याचे घर इतून किती दूर आहे, यापासून तो कशाने आला, त्याचे घर कोणत्या मजल्यावर आहे, तसेच मुख्य गेट पासून त्याचे शौचालय किती दूर आहे, हे सर्व विचारले. हे करतांना तो वेगवेगळया बाटल्यांमधून थोडे थोडे औषध काढत होता... त्यानंतर...

वैद्य : 'आता, आधी औषधाचे पैसे दे, मग ते प्या, आणि न थांबता थेट घरी जा. नंतर मला फोन कर...'

रुग्णाने सूचनांचे अचूक पालन केले.

रूग्ण : (अर्ध्या तासानंतर, कमकुवत आवाजात) 'वैद्य साहेब, औषध खूप छान होते, पण तुम्ही पायजम्याची नाडी सोडण्यासाठी लागणारा वेळ मोजला नाही.. त्यात थोडी गफलत झाली तुमची...!!'

# ने.हि. उच्च माध्य. विद्यालय, ब्रम्हपुरी 'राज्यस्तरीय आदर्श शाळा' पुरस्काराने सन्मानित

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागपूर विभागात आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियोजनबद्ध नवोपक्रम, शिस्तप्रिय, संस्कारक्षम व आनंददायी वातावरण इत्यादी अनेकविध वैशिष्ट्यांमुळे विशेष ओळख निर्माण करणाऱ्या नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरीला २०२५-२६ या शैक्षणिक सत्रातील 'राज्यस्तरीय आदर्श शाळा' पुरस्काराने




गौरविण्यात आले आहे. विद्यालयाचे अभिनव उपक्रम, उत्कृष्ट व्यवस्थापन, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्य तथा शैक्षणिक गुणवत्तेतील सातत्यपूर्ण प्रगती यांची दखल घेऊन राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्यस्तरावर शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या 'ध्येय एज्युकेशन फाउंडेशन, पुणे' या संस्थेद्वारा पिंपरी -चिंचवड (पुणे) येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाचे प्राचार्य के. एम. नाईक आणि पर्यवेक्षक प्रा. पी. आर. जीभकाटे यांनी सदर पुरस्कार स्विकारला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यालयाचे नावीन्यपूर्ण उपक्रम व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे कौतुक करतांना भविष्यातही अशीच प्रगती कायम राखण्याच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यालय 'राज्यस्तरीय आदर्श शाळा' पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताबाई भैया, सचिव अशोक भैया, सहसचिव ॲड. भास्करराव उराडे, सदस्य प्रा. सुभाषजी बजाज, सदस्य गौरवजी भैया व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या सन्मानामुळे विद्यालयाचे शिक्षकवृंद, प्रशासकीय कर्मचारीवृंद, विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण असून संपूर्ण ब्रम्हपुरी परिसरात विद्यालयाचे कौतुक होत आहे.

# तालुक्यातील सर्व १७ धान खरेदी केंद्राची लिमिट वाढवा

## प्रा. प्रकाश बगमारे यांची निवेदनातून मुख्यमंत्र्यांकडे मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

पूर्व विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या



प्रमाणात धानाची शेती केली जाते आणि विविध खरेदी केंद्राच्या माध्यमातून ही खरेदी केली जाते. ही धान्य खरेदी नोव्हेंबर-डिसेंबर २०२५ पासून सुरू झाली आणि फेब्रुवारी २०२६ पर्यंत अनेकांनी आपले धान शासकीय खरेदी केंद्रावर दिलीत. परंतु इतक्या दिवसाचा कालावधी होऊन सुद्धा अजूनही लिमिट अभावी खरेदी केलेल्या धान्याचे बिलिंग झालेले नाही आणि यामुळे शेतकऱ्यांना अजूनही धान चुकारे मिळालेले नाही.

शेतकऱ्यांच्या दृष्टीने पुढील हंगामाची तयारी, कुटुंबाचा औषधोपचार, मुलांचे शिक्षण, आणि लग्नसमारंभातील खर्च या सर्वांसाठी पैशाची खूप गरज असते. परंतु सरकारच्या वेळकाढू धोरणामुळे आणि आधारभूत धान खरेदी केंद्राची लिमिट वाढवून न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांना नरक यातना भोगाव्या लागत आहेत. त्यातच महत्वाचे म्हणजे पीक कर्जाची रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२६ ही अंतिम तारीख असते पण इथे जीवनातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी पैसा नाही तर पीक कर्ज वेळेत कसे भरता येईल, याचा विचार करून सरकारने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे म्हणून राज्याचे मुख्यमंत्री नाम. देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात जातीने लक्ष घालून ब्रह्मपुरी तालुक्यातील तथा पूर्व विदर्भातील सर्वच धान खरेदी केंद्राची लिमिट वाढवून त्याची बिलिंग करून शेतकऱ्यांचा या अडचणी दूर कराव्या यासाठी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा प्रकाश बगमारे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार ब्रह्मपुरी मार्फत मान.देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.

याप्रसंगी भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा महामंत्री तथा नगरसेवक मनोज भुपाल, राजू भागवत, घनश्याम सूर्यवंशी, प्रा दिवाकर पिलारे, डॉ. हरिदास तूपटे, प्रदीप दादाजी राऊत, प्रभुजी अवसरे, सुरेश मेश्राम, रहमान खान पठाण व अन्य उपस्थित होते.

# विश्व आरोग्य दिन उत्साहात संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

दि.७.४.२०२६ रोजी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आणि एम.आय.पी.बेटाला यांच्या संयुक्त विद्यमाने ७६व्या विश्व आरोग्य दिनाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन दुधे आणि राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. श्रीकांत महाजन यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की आरोग्य हे पूर्णपणे शारीरिक, मानसिक, सामाजिक तसेच आध्यात्मिक दृष्ट्या शारिरीक व मानसिक समतोल साधण्याचे काम करते. याचा अर्थ शरीर आणि मन हे पूर्णपणे स्वस्थ आहे, असे नाही. कारण स्वच्छ मन, स्वच्छ तन, स्वच्छ वातावरण, नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि नियमित ध्यान करणे हे स्वच्छ मन आणि निरोगी शरीरासाठी आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस.अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन तसेच संचालन व आभार प्रदर्शन प्रा.देवाशीष भरणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे तसेच प्राचार्य डॉ.सचिन दुधे यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या

# ज्ञानोपासक विद्यालय, निलज येथे स्पर्धा परीक्षा व कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक ०६ एप्रिल २०२६ ला माननीय पोलीस निरीक्षक प्रमोद बाणबले साहेब ,पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी यांचे मार्गदर्शनाखाली ज्ञानोपासक कनिष्ठ महाविद्यालय निलज येथे स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन तसेच एमपीएससी परीक्षेचे मार्गदर्शन कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम



आयोजित करण्यात आला. याप्रसंगी ज्ञानोपासक कनिष्ठ महाविद्यालयाचे संपूर्ण विद्यार्थी तसेच निरुपा विद्यालय रुई तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निलज येथील विद्यार्थी तसेच गावातील गावकरी मंडळी निलज, रुई व पाचगाव येथील स्पर्धा परीक्षा ची तयारी करणारे विद्यार्थी हे हजर होते.

प्रसंगी रेवणसिद्ध कदम पोलीस उपनिरीक्षक यांनी स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन तसेच एमपी एस सी विषयीचे मार्गदर्शन केले तसेच पोलीस हवालदार अरुण पिसे यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर मार्गदर्शन केले. सोबत उपस्थितांना वाहतूक सुरक्षेचे नियमन, अमली पदार्थाबाबत माहिती, लैंगिक अपराधापासून बालकाच्या संरक्षण अधिनियम पोस्को ॲक्ट, भारतात नवीन लागू झालेले भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी सुरक्षा सहिता, भारतीय साक्ष सहिता या तिन्ही कायद्याविषयी माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाला ज्ञानोपासक विद्यालयाचे मुख्याध्यापक धनराज चौधरी, लोखंडे सर, गोदरे सर, भावे सर, रामटेके सर, राऊत सर, भोयर सर, बोरिवार सर तसेच निरुपा विद्यालयाचे मुख्याध्यापक धोंगडे सर, नंगे सर, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बनकर सर, भरणे मॅडम हे हजर होते. कार्यक्रमाचे वेळी पाचशे विद्यार्थी व गावकरी मंडळी उपस्थित होते.

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगांव पांडवच्या यशाची "चांदा ज्योती"

## सुपर-१०० उपक्रमात विद्यालयाच्या तीन विद्यार्थीनींची उत्तुंग भरारी

नागभीड/प्रतिनिधी

चंद्रपूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या 'चांदा ज्योती सुपर-१००' या उपक्रमात नवेगाव पांडव येथील नेवाजाबाई हितकारीणी विद्यालयाने आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. या विद्यालयातील धनश्री ज्ञानेश्वर नन्नावरे, श्रुती भाऊराव नन्नावरे आणि अक्षरा अज्ञान लोणारे या तीन गुणवंत विद्यार्थिनींनी जिल्ह्यातील कठीण चाळणी परीक्षेत घवघवीत यश संपादन करत 'सुपर-१००' मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमासाठी संपूर्ण जिल्ह्यातून जवळपास ८,००० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि त्यातून ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेतून एकाच विद्यालयातील तीन विद्यार्थिनींची निवड होणे, ही शाळेसाठी आणि संपूर्ण परिसरासाठी अत्यंत अभिमानाची बाब मानली जात आहे.

या निवडीमुळे या ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या डॉक्टर किंवा अभियंता होण्याच्या मार्गातील अडथळे आता दूर झाले आहेत. जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे या विद्यार्थिनींना पुढील उच्च शिक्षणासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, त्यांच्या निवासाचा आणि प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च शिक्षण विभाग उचलणार असल्याने, त्यांच्यासाठी अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाची दारे आता खऱ्या अर्थाने उघडली गेली आहेत. विद्यार्थिनींच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण नवेगाव पांडव परिसरातून आनंदाचे वातावरण असून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. १० वीच्या वर्गातील या हुशार विद्यार्थिनींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीच्या जोरावर हे यश खेचून आणले आहे.

या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी तिन्ही विद्यार्थिनींचे मनापासून अभिनंदन केले आहे. 'ग्रामीण भागातील गुणवत्तेला योग्य संधी मिळाली की ते आकाशाला गवसणी घालू शकतात, हे या विद्यार्थिनींनी सिद्ध केले आहे,' अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्य महिलांकरीता खुली भव्य सायकल रेस

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतीय जनता पक्ष महिला आघाडीच्या वतीने दि. १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त महिला व मुलींसाठी भव्य खुली सायकल रेस चे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे पहिले बक्षीस रु. ५००० तर दुसरे बक्षीस रु. ३००० व तिसरे बक्षीस रु २००० आहे. तसेच प्रोत्साहनपर तीन बक्षीसे व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. ही स्पर्धा दि. १४ एप्रिल २०२६ रोज मंगळवार ला सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून प्रारंभ होणार आहे. या सायकल रेसचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तुंबळी मेंढा परत तुंबळी मेंढा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक असा राहणार आहे.

तरी या स्पर्धेत जास्तीत जास्त महिला व मुलींनी सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा महिला आघाडी शहरच्यावतीने करण्यात येत आहे. संपर्कासाठी मो.क्र. रश्मी पेशने (९०२१४४०५४४), वर्षा चौधरी (८००७७३६७८१), मांजरी राजनागकर (९४०५९४२४४४) आहे.

## भाजपचा ४६ वा स्थापना दिन उत्साहात

### प्रा. देशकर यांचे हस्ते पक्ष कार्यालयात ध्वजारोहण

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टीचा ४६ वा स्थापना दिवस ब्रह्मपुरी येथील पक्ष कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या नंतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षासाठी अहोरात्र परिश्रम घेऊन पक्षाला मोठ यश मिळवून देणाऱ्यांना अभिवादन केले. या प्रसंगी कार्यकर्त्यांनी मिठाई वाटून आनंद व्यक्त केला.



यावेळी प्रा. दिलीप जुमडे यांनी पक्षाच्या इतिहासावर प्रकाश टाकला. या प्रसंगी कार्यक्रमाला जेष्ठ नेते प्रा. शेख सर, भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे, शहर अध्यक्ष प्रा.डॉ. सुयोग बाळबुधे, भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश पदाधिकारी प्रा. प्रकाश बगमारे, जिल्हा सचिव साकेत भानारकर, माजी तालुकाध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे, माजी तालुकाध्यक्ष दीपक उराडे, माजी शहर अध्यक्ष अरविंद नंदुरकर, भाजपा युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस तनय देशकर, शहर महामंत्री पवन जयस्वाल, जिल्हा उपाध्यक्ष रश्मी पेशने, माजी नगरसेवक मनोज वठे, उपाध्यक्ष प्रशांत वसाके, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अमित रोकडे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा चौधरी, राजू भागवत, रहमान पठाण, गौरव भैया, प्रा. संजय लांबे, प्रा. अशोक सालोटकर, प्रा. चंद्रकांत विटाळकर यांच्या सह मोठ्या संख्येने भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## चौगानमध्ये जेष्ठ नागरिकांनी उभारली पाणपोई

### तहानलेल्या प्रवाशांकरीता गुरूदेव सेवा मंडळाचा उपक्रम




ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील चौगान येथे श्री. गुरुदेव सेवा मंडळाच्या पुढाकारातून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज परिसर, मुख्य बाजार चौकात पाणपोई उभारण्यात आली आहे. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागरिक व प्रवाशांसाठी हा उपक्रम मोठा दिलासा ठरत आहे.

सध्या एप्रिल महिन्यापासून उन्हाची तीव्रता वाढू लागली असून पाणी ही जीवनावश्यक गरज अधिक महत्त्वाची ठरते. चौगान हे ब्रम्हपुरी तालुक्यातील एक महत्त्वाचे व मोठ्या लोकवस्तीचे गाव असल्यामुळे येथे सतत नागरिकांची वर्दळ असते. मुख्य चौकातून ब्रम्हपुरी, चकबोथली, जुगनाळा व गांगलवाडी या मार्गांवर जाणाऱ्या प्रवाशांची ये-जा मोठ्या प्रमाणावर होते. त्यातच लग्नसराईच्या हंगामामुळे गावात येणाऱ्या- जाणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे. या पार्श्वभूमीवर कोणालाही पाण्याची अडचण भासू नये या उद्देशाने पाणपोई सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, श्री. गुरुदेव सेवा मंडळातील सभासद व गावातील कलावंतांनी स्वतःच्या मानधनातून निधी जमा करून या पाणपोईची उभारणी केली आहे. गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

'भुकेल्याला अन्न आणि तहानलेल्या व्यक्तीला पाणी देणे हीच खरी सेवा' असे संतांचे विचार लक्षात ठेवत, उन्हाळ्यात पाणी पाजण्याचे हे कार्य अत्यंत पुण्याचे मानले जाते. त्यामुळे चौगाण येथील नागरिकांनी उचललेले हे पाऊल समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या उपक्रमामुळे इतर गावांनाही अशा सामाजिक कार्याची प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भीम जन्माची गाथा

आले भीमराव जन्मास
झाली पवित्र महूची भूमी
सकपाळ कुळ चमकले
आले दलितांच्या कामी....

लिहिली घटना भारताची
झाले घटनेचे शिल्पकार
समता स्वातंत्र्य बंधुता
सर्वांना समान अधिकार....

घेतली दिक्षा बौद्ध धम्माची
तथागताच्या तत्वज्ञानाची
विज्ञानवादी दृष्टिकोन
विश्व बंधुता मानवतेची....

माझ्या भीम जन्माची गाथा
गाजे जगाच्या इतिहासात
कोरले नाव सुवर्णाक्षरांनी
चमकले साऱ्या जगतात....

घटनेच्या पहिल्या पानावर
समतेचा तू रचला पाया
वदंन तुज करितो भीमराया
अपार कष्ट नाही गेले वाया....

तू मार्गदाता विश्वविधाता
चंदनापरी सदा झिजलास
जन्मभर कष्ट सोसूनिया
देशाची घटना लिहिलास....

प्रा.नानाजी रामटेके
ब्रम्हपुरी जिल्हा चंद्रपूर
संपर्क : ९८२२०२२४९४

# ग्रा.पं. अऱ्हेरनवरगांव भ्रष्टाचार विरोधात आमरण उपोषणाला स्थगिती

## भ्रष्टाचाराची चौकशी त्रिस्तरीय समितीमार्फत होण्याचे लेखी आश्वासन, आश्वासने पूर्ण न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन

ब्रम्हपुरी/का.प्र.

ग्रामपंचायत अऱ्हेरनवरगाव येथील भ्रष्टाचार व मनमानी कारभाराविरोधात श्रीकांत हरिदास पिलारे व साहिल अरुण पिलारे यांनी पंचायत समिती ब्रह्मपुरी समोर दिनांक ३० मार्च २०२६ पासून सुरू असलेले बेमुदत आमरण उपोषण स्थगित करण्यात आले.




माजी आमदार प्रा. अतुल देशकर तसेच उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांच्या समक्ष झालेल्या निर्णायक चर्चेनंतर हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रविंद्र घुबडे यांनी उपोषणकर्त्यांनी मांडलेल्या गंभीर मागण्यांबाबत माहिती देताना स्पष्ट केले की, त्रिसदस्यीय समितीमार्फत होणारी चौकशी व विभागीय चौकशी या दोन्ही पूर्णपणे स्वतंत्र स्वरूपाच्या असून त्या वेगवेगळ्या पद्धतीने राबविण्यात येणार आहेत. दोन्ही चौकशीचे स्वतंत्र अहवाल तयार करून पुढील निलंबनासह आवश्यक कारवाईसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. तसेच, चौकशी प्रक्रियेची निष्पक्षता अबाधित राहावी यासाठी ग्रामपंचायत अऱ्हेरनवरगावचे सचिव रतीराम चौधरी यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत कामकाजापासून दूर ठेवण्यात येईल, असे ठोस आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

प्रशासनाने वेळमर्यादाही निश्चित करत त्रिसदस्यीय समितीची चौकशी एका महिन्यात, तर विभागीय चौकशी तीन महिन्यात पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या या ठोस व लेखी आश्वासनांवर विश्वास ठेवून उपोषणकर्त्यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले आहे. मात्र, दिलेली आश्वासने पूर्ण न झाल्यास पुन्हा अधिक तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे यांचा सेवानिवृत्तीपर निरोप समारंभ संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित महाराष्ट्र विद्यालय, पिंपळगाव (भोसले) येथील मुख्याध्यापक ओमप्रकाश बगमारे यांच्या सेवानिवृत्तीपर निरोप समारंभ नुकताच पार पडला.



त्यांनी आपल्या सेवेदरम्यान खेळीमेळीच्या वातावरणात पिंपळगांव, आवळगांव, पिंपळगांव हा प्रवास शाळेतील सर्व कर्मचारी, विद्यार्थी व गावातील नागरिकांशी मिळून मिसळून सर्वांच्या सुखदु:खात सहभागी होऊन, संस्था, शाळेच्या हिताचे कार्य करून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व शाळेचा नावलौकिक करण्यासाठी सतत धडपड केली. ३१ मार्च २०२६ ला ३३ वर्षाची सेवा केल्यानंतर ओमप्रकाश मुखरुजी बगमारे नियत वयोमानानुसार मुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाल्यामुळे विद्यालयाच्या वतीने निरोप समारंभाचा कार्यक्रम घेऊन त्यांना निरोप देण्यात आला.

यावेळी शिक्षक पुरी , सचिन कऱ्हाडे, महल्ले, घ्यार, नाकाडे, शिक्षिका अंशुल राऊत ,भूते, शिक्षकेतर कर्मचारी अनिल महाजन, गुलाब वाघाडे, राम कैलास भारती, विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सडमाके यांनी केले.

# ब्रम्हपुरीच्या संगीत शिक्षिका मेघा करकाडे यांनी रचला इतिहास

ब्रम्हपुरी/का.प्र.

उपराजधानी नागपूर येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित संगीत कार्यक्रमात श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालयातील संगीत विभाग प्रमुख प्रा. दीपश्री पाटील व त्यांच्या आजी-माजी अशा एकूण ४० विद्यार्थिनींचा सहभाग होता.

भारतीय शास्त्रीय संगीतातील एकूण ३६ रागांवर आधारित प्रा. दीपश्री पाटील रचित ८१ बंदिशिंचं सलग २ तास सादरीकरण करण्यात आलं. या सादरीकरणाची नोंद इंडिया बुक तथा आशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली. आपल्या चंद्रपूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब म्हणजे ब्रम्हपुरी येथील स्टेम पोदार लर्न स्कुल तथा नादब्रह्म संगीत




विद्यालयातील संगीत शिक्षिका मेघा दुर्वास करकाडे यांचा या सादरीकरणात प्रामुख्याने सहभाग होता. त्यांनी हा रेकॉर्ड आपल्या नावावर केल्यामुळे त्यांचं सर्वत्र कौतुक होत आहे.

# डि. फार्म विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील बेटाला येथील महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे दि.२.४.२०२६ ला डी.फॉर्म फायनल च्या विद्यार्थांकरीता प्रथम वर्ष डी.फॉर्म च्या विद्यार्थांतर्फे निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी प्राचार्य डॉ.सचिन दूधे, रा.से.यो.अधिकारी प्रा.श्रीकांत महाजन, प्रा. विजया सोनवणे आणि डॉ. प्रा.सुहास साकरकर, डॉ.प्रा.अनुप बारसागडे, प्रा.पृथ्वीराज मेश्राम, प्रा.छगन डोईजड, प्रा. चेतन चौधरी, प्रा.सविता वसाके, प्रा.पूजा घुटके, प्रा.प्रसेनजीत लांडगे, प्रा. अमिषा जयस्वाल, प्रा.राकेश तरारे, प्रा.रेश्मा मातेरे, प्रा. देवाशीष भरने तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या प्रसंगी एन.एस.एस.ऑफिसर प्रा.श्रीकांत महाजन आणि प्रा.भूपेश भेंडारकर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना संबोधित केले. द्वितीय वर्ष डी.फॉर्म च्या विद्यार्थांनि महाविद्यालय, स्टाफ आणि असलेल्या सुविधाविषयी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्ष डी.फॉर्म ची विद्यार्थिनी कु. इंद्रायणी वावरे आणि कु.सेजल बडोले यानी केले व आभार प्रदर्शन कु. चेतना सरोटे हिने केले.

### ... QUOTES ...

"If your actions inspire others to dream more, learn more, do more and become more, you are a leader."

- John Quincy Adams

### चारोळी

कर्ज काढून त्याने घेतली कार
हफ्ते न भरल्याने कार घेऊन गेले...
त्याला पश्चाताप फार झाली,
लग्नासाठी आपण कर्ज का नाही घेतले...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या अभ्यासगट वर्गाची कुर्झा तीर्थक्षेत्री भेट




ब्रह्मपुरी/का.प्र.


येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील बी.ए. द्वितीय सत्र चवथे मधिल अभ्यासगट विद्यार्थ्यांनी कुर्झा वार्डात रामनवमी ते हनुमान जयंतीनिमित्त साजरा होत भागवतकथा प्रवचनस्थळी नुकतीच भेट देऊन या तीर्थक्षेत्रातील प्राचीन हनुमान देवस्थान व शिवमंदिर तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिराची माहिती संकलित केली. याशिवाय येथिल शतकोत्तर भागवत कथा पारायण परंपरेचा इतिहास माहित करुन घेतला. यावर्षी अकोला येथील डॉ प्रशांत महाराज ठाकरे यांच्या प्रवचनाचा लाभही विद्यार्थ्यांनी घेतला.

सदर विद्यार्थ्यांचा अभ्यासगट प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, मराठी विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, डॉ पद्माकर वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून यात वैतरणी सोनुले, साहिली दोनाडकर, अंकिता सोंदरकर, प्राची उरकुडे, जानिया शेबे, तनू गडे, आरती मिसार, काजल नखाते, तन्मय हनवते, गोपाल कुंभरे व इतर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.




प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# अऱ्हेरनवरगांव येथे हरिनाम सप्ताहाचा समारोप

ब्रम्हपुरी/का.प्र.

हनुमान देवस्थान सेवा समिती, अऱ्हेरनवरगांव च्या वतीने हरिभक्त परायण केशरताई मेश्राम



व संच सानगडी यांच्या वाणीतून दिनांक २८ ते ०३/०४/२६ पर्यंत श्रीमद श्रीकृष्ण ज्ञानयज्ञ , ग्रामगीता तत्त्वज्ञान रहस्य हरिनाम भागवत सप्ताहाचे वाचन करण्यात आले.

हनुमान जयंतीचे औचित्य साधून दिनांक ०३/०४/२६ ला गोपाल काला व महाप्रसादाच्या कार्यक्रमा प्रित्यर्थ प्रमुख अतिथी म्हणून सतीश वारजूरकर, मेजर अरुण पिसे, ग्राम महसूल अधिकारी संजय मटाले, अमरदीप लोखंडे, प्रशांत राऊत पत्रकार, वामन मिसार, धनंजय मेश्राम व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

प्रमुख अतिथींच्या हस्ते सुरेश आडकिने, नंदुजी वैद्य, वंदना देवतळे यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील नागरिक ,तरुण वर्ग हनुमान देवस्थान समिती अध्यक्ष ब्रम्हदास सावजकर, सचिव प्रभू कुथे, संयोजक हरिभाऊ बेदरे व इतर पदाधिकारी यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम शांततामय वातावरणात पार पाडला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. मंगेश देवढगले यांनी केले.

# ७२ लाखांच्या वसुलीचे कंत्राट...

(पान क्र. १ वरून)

(अंदाज): ५०० विक्रेते २० रुपये - १०,००० रुपये दररोज, मासिक वसुली: १०,००० ३० दिवस - ३,००,००० रुपये प्रति महिना, वार्षिक वसुली: ३,००,००० १२ महिने - ३६,००,००० रुपये प्रति वर्ष जेथे कंत्राटदाराला वर्षाला ३६ लाखांहून अधिक उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे, तेथे नगर परिषदेने केवळ ६ लाखांत कंत्राट का दिले? ३० लाखांच्या या संभाव्य तफावतीमुळे प्रशासकीय पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आमच्याकडून दररोज नियमाने पैसे वसूल केले जातात, मग तो पैसा पालिकेच्या तिजोरीत का जात नाही? असा संतप्त सवाल छोटे विक्रेते विचारत आहेत. या प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, किरकोळ व्यावसायिकांनी नगर परिषदेला निवेदन दिले आहे. हे कंत्राट तत्काळ रद्द करून वसुलीची प्रक्रिया थेट नगर परिषदेने स्वत: राबवावी, जेणेकरून छोट्या विक्रेत्यांना दिलासा मिळेल आणि शासकीय महसूलही वाढेल, अशी मागणी जोर धरत आहे. आता या प्रकरणात जिल्हा प्रशासन हस्तक्षेप करून चौकशी करणार का, याकडे संपूर्ण ब्रह्मपुरी शहराचे लक्ष लागले आहे.


- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315


# आम. अडबले यांचेकडून वैनगंगा विद्यालयाला संगणक व प्रिंटर भेट

ब्रम्हपुरी/का.प्र.

महात्मा फुले शिक्षण संस्था ब्रम्हपुरी द्वारा संचालित वैनगंगा विद्यालय कोलारी ता. ब्रम्हपुरी शाळेला शिक्षक आमदार सुधाकरजी अडबाले यांच्या तर्फे संगणक व प्रिंटर भेट देण्यात आला.



वैनगंगा विद्यालय कोलारी ही शाळा चंद्रपूर च्या पूर्वेस १५५ कि.मी. अंतरावर ब्रम्हपुरी तालुक्यात शेवटच्या टोकावर असून इथे ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येतात. एवढ्या दुर्गम भागात शिक्षणाची सुविधा संस्थाचालक प्राचार्य डॉ. देविदास जगनाडे अध्यक्ष, महात्मा फुले शिक्षण संस्था व प्राचार्य डॉ. नामदेव कोकोडे सचिव, महात्मा फुले शिक्षण संस्था व सदस्य यांच्या प्रयत्नाने चालू आहे.

दुर्गम भागातील शाळेत ज्या प्रमाणे भौतिक सुविधांची कमतरता असते तेव्हा अशीच उपलब्धता विद्यार्थ्यांसाठी कामाची ठरते. शिक्षक आमदार सुधाकरजी अडबाले सरांच्या कार्यकुशलता व पुढाकाराने तालुक्यातील व जिल्ह्यातील असंख्य शाळांना याचा लाभ मिळाला त्याबाबत त्यांचे महात्मा फुले शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी चे अध्यक्ष / सचिव तथा सदस्य, मुख्याध्यापक धनंजय दाते व सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभार व धन्यवाद मानले आहे.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404